# जागतिक हवामान बदलावर उद्यापासून आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

## देश-विदेशातील शास्त्रज्ञांची उपस्थिती; कुलगुरू व्यंकटेश्वरलू यांची पत्रपरिषद



**औरंगाबाद / प्रतिनिधी**

'जागतिक हवामान बदल व त्याचे कृषी व जलक्षेत्रावर होणारे परिणाम' या विषयावर चार कृषी विद्यापीठे, जल आणि भूमी व्यवस्थापन संस्थेसह (वाल्मी) विविध शासकीय, निमशासकीय संस्थांतर्फे १४ ते १६ डिसेंबर असे तीन दिवस औरंगाबादमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. देश-विदेशातील हवामान शास्त्रज्ञांसह विविध विषयांतील तज्ज्ञ, शेतकरी यात सहभागी होणार असल्याची माहिती परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांनी मंगळवारी (दि. १२) 'वाल्मी'त आयोजित पत्रपरिषदेत दिली. 'वाल्मी'च्या सभागृहात आयोजित 'हवामान बदलाची माहिती व होणारे परिणाम' याविषयी विविध विषयांवर एकूण १२ चर्चासत्र होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन गुरुवारी एमजीएममधील रुख्मिणी सभागृहात सकाळी दहाला दिल्ली येथील नीती आयोगाचे सदस्य डॉ. रमेश चंद यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे माजी महासंचालक पद्मभूषण डॉ. आर. एस. परोडा, आयोजन समितीचे अध्यक्ष कुलगुरू डॉ. बी. व्यंकटेश्वरलू, सहअध्यक्ष राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. पी. विश्वनाथ, दापोलीच्या कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तपस भट्टाचार्य, अकोल्याच्या पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास भाले, 'इक्रिसॅट'चे महासंचालक डॉ. बर्व्हिन सन, 'वाल्मी'चे महासंचालक एच. के. गोसावी, महिकोचे अध्यक्ष राजू बारवाले यांची प्रमुख उपस्थिती राहील. उद्घाटनांनतर दुपारी 'वाल्मी' सभागृहात चर्चासत्राला प्रारंभ होईल. हवामान बदलावर आधारित उपकरणे, साहित्य आणि विविध पुस्तकांसह कंपन्यांचे प्रदर्शनही भरवले जाणार आहे. या वेळी ऑस्ट्रेलियातील जलतज्ज्ञ कार्ल डॉमेन, सहसंयोजक डॉ. सुनील गोरंटीवार व डॉ. अविनाश गरुडकर, आयोजन सचिव कोरडवाहू संशोधन केंद्राचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. भगवान आसेवार, कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढवन, संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वास्कर, डॉ. सुनील गोरंटीवार, डॉ. भगवान आसेवार, डॉ. हेमंत पाटील, डॉ. कैलाश डाखुरे, डॉ. बेग आदी उपस्थित होते.

## संकेतस्थळाला हजारो शास्त्रज्ञांनी दिली भेट

जागतिक हवामान बदलावर आधारित आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनासाठी संकेतस्थळ 'डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू. सीसीएडब्ल्यू २०१७ .ओआरजी' तयार करण्यात आले आहे. या संकेतस्थळाला आजपर्यंत सुमारे २५ हजारांहून अधिक शास्त्रज्ञांनी भेट दिली आहे. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांत अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, श्रीलंका, व्हिएतनाम, बांगलादेश, नेपाळ आदी विविध देशांतील हवामानतज्ज्ञ, जलतज्ज्ञ आणि ज्येष्ठ-श्रेष्ठ ख्यातनाम शास्त्रज्ञ सहभागी होऊन उपयुक्त मार्गदर्शन करणार आहेत. दरम्यान, या चर्चासत्राच्या निमित्ताने देश-विदेशांतून आतापर्यंत ८०० हून अधिक संशोधनपर निबंध प्राप्त झाले असून ६०० हून अधिक शास्त्रज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी या चर्चासत्रात सहभागी होणार असल्याची माहिती परभणी कृषी विद्यापीठातील संशोधन संचालक डॉ. दत्तप्रसाद वासकर यांनी दिली.